Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors can opt for only one mode of voting i.e., either through remote e-voting or e-voting during the respective Meeting. The Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors who have cast their vote by remote e-voting prior to the respective Meeting may attend / participate in the respective Meeting through VC / OAVM but shall not be entitled to cast their vote again.

The Scheme, if approved by the Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors of the First Applicant Company/ Transferor Company at their respective meetings, will be subject to the subsequent approval of the NCLT and such other approvals, permissions and sanctions from any other regulatory or statutory authority(ies) as may be deemed necessary and as contemplated in the Scheme.

In case of any queries / grievances regarding attending the respective Meetings through VC / OAVM or remote e-voting, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors may write to the First Applicant Company/ Transferor Company at compliance@profectuscapital.com. Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors can also refer to the Frequently Asked Questions ('FAQs') for Creditors and e-Voting user manual for Creditors available in 'Download' section of www.evoting.nsdl.com or call on 022 - 4886 7000 or send a request to Ms. Pallavi Mhatre at evoting@nsdl.com.

The results of the Meetings shall be announced in accordance with the regulatory requirements or as prescribed by the Hon'ble NCLT upon receipt of Scrutinizer's report and the same shall be displayed at the registered office of the First Applicant Company/ Transferor Company as well as on the website of the First Applicant Company/ Transferor Company at www.profectuscapital.com and on the NSDL website at www.evoting.nsdl.com besides being communicated to the Stock Exchange i.e. NSE.

Place: Mumbai
Date: 19-08-2026

Sd/-
H.V. Subba Rao
Chairperson for the Meetings of the Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors

UGRO CAPITAL

UGRO CAPITAL LIMITED

CIN: L67120MH1993PLC070739
Registered Office: B-17, Fourth Floor, Art Guild House, Phoenix Market City, Kurla (West), Mumbai - 400070
E-mail: cs@ugrocapital.com, **Website:** www.ugrocapital.com
Telephone: +91 22 68269100

FORM NO. CAA. 2

[Pursuant to Section 230 (3) and Rule 6 and 7 of the Companies (Compromises, Arrangements and Amalgamations) Rules, 2016]

IN THE NATIONAL COMPANY LAW TRIBUNAL,
MUMBAI BENCH
C.A. (CAA) NO. 141/MB/2026

In the matter of the Companies Act, 2013;

AND

In the matter of Sections 230 to 232 read with Section 52 and other applicable provisions of the Companies Act, 2013 and rules framed thereunder;

AND

In the matter of Scheme of Amalgamation between Profectus Capital Private Limited ("Transferor Company" or "First Applicant Company") having CIN: U65999MH2017PTC295967 with UGRO Capital Limited ("Transferee Company" or "Second Applicant Company") having CIN: L67120MH1993PLC070739 and their respective shareholders and creditors ('Scheme')

UGRO Capital Limited,
a company incorporated under the provisions of the Companies Act, }
1956 having its registered office at B-17, Fourth Floor, Art Guild House, }
Phoenix Market City Kurla (West), Mumbai - 400070 }
CIN: L67120MH1993PLC070739 } …Second Applicant Company/ Transferee Company

NOTICE AND ADVERTISEMENT FOR MEETING OF THE EQUITY SHAREHOLDERS, SECURED CREDITORS (INCLUDING SECURED NON-CONVERTIBLE DEBENTURE HOLDERS) AND UNSECURED CREDITORS (INCLUDING UNSECURED NON-CONVERTIBLE DEBENTURE HOLDERS) OF THE SECOND APPLICANT COMPANY / TRANSFEREE COMPANY

Notice is hereby given that by an Order dated 6th August 2026 (**"Order"**), the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench (**"NCLT"**) has directed separate meetings to be held of the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company through Video Conferencing (**"VC"**) / Other Audio-Visual Means (**"OAVM"**) for the purpose of considering, and if thought fit, approving with or without modification(s), the Scheme of Amalgamation between Profectus Capital Private Limited (**"First Applicant Company" / "Transferor Company"**) with UGRO Capital Limited (**"Second Applicant Company" / "Transferee Company"**) and their respective shareholders and creditors (**"Scheme"**) pursuant to Sections 230 to 232 read with Section 52 and other applicable provisions of the Companies Act, 2013 (**"Act"**) and rules made thereunder.

In pursuance of the said Order and as directed therein, further notice is hereby given that separate meetings of the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company will be held through **VC/OAVM**, in compliance with the provisions of Section 230(4) read with Section 108 of the Act, Rule 20 and other applicable provisions of the Companies (Management and Administration) Rules, 2014 and Regulation 44(1) of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 as amended from time to time (**"SEBI LODR Regulations"**), and Secretarial Standard - 2 on General Meetings (**"SS-2"**) issued by the Institute of Company Secretaries of India, as amended from time to time in this regard, as per the schedule indicated in the table below:

Sr. No.	Class of Meeting	Time (IST)	Day/Date of Meeting
1.	Equity Shareholders	10.30 AM	Tuesday, 22nd September 2026
2.	Secured Creditors	12.15 PM	Tuesday, 22nd September 2026
3.	Unsecured Creditors	2.30 PM	Tuesday, 22nd September 2026

The cut-off date for determining the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company eligible to attend and vote at the respective Meetings and time period for the remote e-voting of the aforesaid Meetings is as under:

Class of Meeting	Equity Shareholders	Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders)	Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders)
Cut-off date	15th September 2026	31st March 2026	31st March 2026
Remote e-voting date and time			
Start Time:	Saturday, 19th September 2026 at 9:00 A.M	Saturday, 19th September 2026 at 9:00 A.M	Saturday, 19th September 2026 at 9:00 A.M
End Time:	Monday, 21st September 2026 at 5:00 P.M	Monday, 21st September 2026 at 5:00 P.M	Monday, 21st September 2026 at 5:00 P.M

The Second Applicant Company/ Transferee Company has appointed National Securities Depository Limited ("NSDL") to provide the facility for voting through remote e-voting, for participation in the Meetings through VC/OAVM facility and e-voting during the Meetings.

The Second Applicant Company/ Transferee Company has completed the dispatch of the Notice convening the Meetings along with the Scheme and the Explanatory Statement as required under Sections 102, 230 to 232 and other applicable provisions of the Act, read with Rule 6 of the Companies (Compromises, Arrangements and Amalgamations) Rules, 2016 (**"Notice"**) on 18th August 2026, through electronic mode to all Equity Shareholders whose names appear in the register of members/list of beneficial owners of the Second Applicant Company/ Transferee Company as on 30th June 2026 and whose e-mail addresses are registered/available with the Second Applicant Company/ Transferee Company, the depositories, the registrar and transfer agent or other relevant records, as applicable and to all Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) whose names appear in the books/records maintained by the Second Applicant Company/ Transferee Company as on 31st March 2026 and whose e-mail addresses are registered/available with the Second Applicant Company/ Transferee Company, or other relevant records, as applicable. Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) whose e-mail addresses are not available have been provided letters containing the weblink and QR code for accessing the documents, in accordance with the NCLT Order.

The aforesaid documents have been made available on the websites of (a) Second Applicant Company/ Transferee Company at www.ugrocapital.com; (b) the stock exchanges i.e. BSE Limited at www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com; and (c) NSDL at www.evoting.nsdl.com.

Copies of the Notice along with the Explanatory Statement including Annexures can be obtained free of charge, between 10:00 A.M. IST to 5:00 P.M. IST on all working days, up to the date of the Meeting, from the registered office of the Second Applicant Company/ Transferee Company or by sending a request along with details of their shareholding or creditor details, as applicable, by e-mail at cs@ugrocapital.com.

The NCLT has appointed Mr. H.V. Subba Rao, Retired Member (Technical), NCLT, as the Chairperson for the Meetings of the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company.

Further, the NCLT has appointed Ms. Akanksha Mota (Membership No. ACS 24626 and CP No. 15096), as the Scrutinizer for the Meetings of the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company to scrutinize the remote e-voting and e-voting during each of the Meetings of the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company in a fair and transparent manner.

The Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company are requested to attend the respective Meetings, as may be applicable, through the mode and on the day, date and time as stated above. Attendance of the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company participating in the Meetings through VC/OAVM facility shall be counted for the purpose of reckoning the quorum under Section 103 of the Act. In case the required quorum as stated above is not present at the commencement of the Meeting(s), the Meeting(s) shall be adjourned for 30 minutes, and thereafter, the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company present shall be deemed to constitute the quorum.

Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company are entitled to attend and may vote through remote e-voting facility prior to the Meetings or through e-voting facility made available during the Meetings. Since the Meetings are being held through VC/OAVM, voting by proxy shall not be permitted and the facility for appointment of proxies by the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) will not be available for the respective Meetings. However, voting through authorised representative in the case of a body corporate shall be permitted, provided the prescribed form/authorisation is filed with the Second Applicant Company/ Transferee Company at cs@ugrocapital.com with a copy marked to shinil.nambrath@ugrocapital.com, no later than 48 (forty-eight) hours before commencement of the respective Meetings, as required under Rule 10 of the Companies (Compromises, Arrangements and Amalgamations) Rules, 2016.

An Equity Shareholder whose name is recorded in the Register of Members/list of Beneficial Owners maintained by the Depositories as on the Cut-off date for Equity Shareholders i.e. 15th September 2026, for the respective Meeting, shall be entitled to avail the facility of e-voting (either by way of remote e-voting facility or through the e-voting facility made available during the Meeting) and attend the aforesaid meeting of the Equity Shareholders. The voting rights of Equity Shareholders shall be in proportion to their shares in the paid-up equity share capital of the Second Applicant Company/Transferee Company as on the Cut-off date for Equity Shareholders. A person who is not an Equity Shareholder of the Second Applicant Company/Transferee Company as on the Cut-off date for Equity Shareholders should treat the Notice for information purposes only.

A Secured Creditor (including Secured Non-Convertible Debenture Holder) / Unsecured Creditor (including Unsecured Non-Convertible Debenture Holder) of the First Applicant Company/ Transferor Company whose name is recorded in the records of the Second Applicant Company/ Transferee Company as on the Cut-off date for Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) i.e. 31st March 2026, for the respective Meetings, shall only be entitled to avail the facility of e-voting (either by way of remote e-voting facility or through the e-voting facility made available during the Meetings) and attend the aforesaid meeting(s) of the Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders). The voting rights of Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) shall be in proportion to the amount due to them in accordance with the books/records maintained by the Second Applicant Company/ Transferee Company as on the Cut-off date for Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders). A person who is not a Secured Creditor (including Secured Non-Convertible Debenture Holder) / Unsecured Creditor (including Unsecured Non-Convertible Debenture Holder) of the Second Applicant Company/ Transferee Company as on the Cut-off date for Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) should treat the Notice for information purposes only.

Any person who acquires shares of the Second Applicant Company/ Transferee Company after dispatch of the Notice and whose name appears in the Register of Members / list of Beneficial Owners maintained by the Depositories as on the Cut-off date for Equity Shareholders i.e. 15th September 2026, can download the Notice from the website of the Second Applicant Company/ Transferee Company at www.ugrocapital.com and may obtain the login ID and password in the manner outlined in the Notice.

Equity Shareholders / Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) can opt for only one mode of voting i.e., either through remote e-voting or e-voting during the respective Meeting. The Equity Shareholders / Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) who have cast their vote by remote e-voting prior to the Meeting(s) may attend / participate in the Meeting(s) through VC / OAVM but shall not be entitled to cast their vote again.

The above mentioned Scheme, if approved by the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) of the Second Applicant Company/ Transferee Company at their respective meetings, will be subject to the subsequent approval of the NCLT and such other approvals, permissions and sanctions from any other regulatory or statutory authority(ies) as may be deemed necessary and as contemplated in the Scheme.

In case of any queries / grievances regarding attending the respective Meetings through VC / OAVM or remote e-voting, Equity Shareholders / Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) may write to the Second Applicant Company/ Transferee Company at cs@ugrocapital.com. Equity Shareholders / Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) can also refer to the Frequently Asked Questions ('FAQs') for Equity Shareholders / Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) / Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders) and e-Voting user manual for Shareholders/Creditors available in 'Download' section of www.evoting.nsdl.com or call on 022 - 4886 7000 or send a request to Ms. Pallavi Mhatre at evoting@nsdl.com.

The results of the Meetings shall be announced in accordance with the regulatory requirements or as prescribed by the Hon'ble NCLT upon receipt of Scrutinizer's report and the same shall be displayed at the registered office of the Second Applicant Company/ Transferee Company as well as on the website of the Second Applicant Company/ Transferee Company at www.ugrocapital.com and on the NSDL website at www.evoting.nsdl.com besides being communicated to the Stock Exchanges i.e. NSE and BSE.

Place: Mumbai

Date: 19-08-2026

Sd/-

H.V. Subba Rao
Chairperson for the Meetings of the Equity Shareholders, Secured Creditors (including Secured Non-Convertible Debenture Holders) and Unsecured Creditors (including Unsecured Non-Convertible Debenture Holders)

गटविकास अधिकाऱ्याला फसवणूकप्रकरणी अटक

पनवेल : ग्रामसेवकाच्या मुलीला बँकेत कायमस्वरूपी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून ३१ लाख २७ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी वसई तालुक्यातील गटविकास अधिकारी छत्तरसिंग राजपूत याला अटक केली आहे. त्याला न्यायालयाने १९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. २०२३ पासून आतापर्यंत राजपूतने ३१ लाख २७ हजार रुपये तक्रारदाराकडून स्वीकारल्याचे पोलिसांनी सांगितले.

गृहसंकुलांमध्ये बोकड ठेवण्याबाबत निर्बंध

भाईंदर : मिरा-भाईंदर शहरात बकरी ईददरम्यान गृहसंकुल आणि सार्वजनिक ठिकाणी कुर्बानीसाठी बोकड आणून ठेवण्यास मनाई करण्याचा ठराव सत्ताधारी भाजपने मंजूर केला. याशिवाय उघड्यावर मांस विक्री, मांसाचे प्रदर्शन आणि कुर्बानीसाठीही महापालिकेने काटेकोर नियम प्रस्तावित केले आहेत.

तीनशे झोपु योजनांमध्ये अधिकारांचा गैरवापर

पालिका आयुक्तांचे नगरविकास विभागाला खरमरीत पत्र

निशांत सरवणकर, लोकसत्ता

मुंबई : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून अधिकारांचा गैरवापर केला जात असल्याबाबत महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी जोरदार आक्षेप घेतला आहे. झोपडपट्टी नसलेल्या मोकळ्या भूखंडांचा पुनर्विकास करण्याच्या नावाखाली प्राधिकरणाकडून अधिकारांचा गैरवापर सुरू असून अशा ३०० योजना असल्याचे भिडे यांनी नगरविकास विभागाला पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. या नियमावलीचे सर्वाधिकार पालिकेकडे द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

विकास नियंत्रण नियमावलीत ३३(१०) नुसार झोपडपट्टीचा पुनर्विकास केला जातो. याशिवाय मोकळ्या भूखंडाचा पुनर्विकास करण्यासाठी ३३(११) ही नियमावली आहे. झोपु योजनेत विकासकांना अधिमूल्यात सवलत आहे. मात्र तो लाभ ३३(११) मधील योजनांना लागू नाही. तरीही तो लाभ झोपु प्राधिकरणाकडून दिला जात होता. याबाबत पहिल्यांदा तत्कालीन पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी २९ ऑगस्ट २०२४ मध्ये आक्षेप घेतला होता. त्यानंतर नगरविकास विभागाने आदेश जारी करत प्राधिकरणाला ३३(११) ही नियमावली झोपु योजनेसोबतच संलग्न करता येईल, असे स्पष्ट केले. मात्र या आदेशांचे पालन होत नसल्याचे आयुक्तांनी म्हटले आहे.

झोपड्या नसलेल्या भूखंडांवरही योजनेचा लाभ?

झोपडीमुक्त परिसराची जबाबदारी पार पाडण्याऐवजी झोपु प्राधिकरण झोपड्या नसलेल्या भूखंडावरही योजना राबवून अधिकारांचा गैरवापर करीत आहे. मोठ्या प्रमाणात सवलती मिळत असल्यामुळे विकासक आता झोपु प्राधिकरणाकडे जात आहेत. त्यामुळे नागरी नियोजनाची जबाबदारी असलेल्या महापालिकेच्या महसुलात मोठ्या प्रमाणात घट होत असल्याकडेही आयुक्तांनी लक्ष वेधले आहे. झोपु प्राधिकरणाने अशा योजना राबविताना सवलतींचा लाभ देऊ नये किंवा ३३ (११) नियमावलीसाठी महापालिकेवर नियोजन प्राधिकरणाची जबाबदारी सोपवावी, अशी मागणी भिडे यांनी केली आहे.

मॉलमधील दुकानांवरही मराठी नामफलक सक्तीचे

मुंबई : दुकानांवरील मराठी नामफलकांबाबत मुंबई महापालिकेने मोहीम हाती घेतल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात मुंबईतील नामांकित आस्थापना, मॉल आणि शॉपिंग सेंटरमधील दुकानांची तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये मराठी नामफलकाच्या नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित आस्थापनांवर कठोर कारवाई करण्याचे पालिका प्रशासनाने ठरवले आहे.

मराठी नामफलकांबाबत गेल्या दोन तीन महिन्यांत केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यासाठी विधी समिती अध्यक्षा दिक्षा कारकर यांनी पालिकेच्या अधिकाऱ्यांबरोबर नुकतीच एक बैठक घेतली. यावेळी एस. व्ही. रोड, एल. बी. एस. रोड, लिंक रोड तसेच पूर्व-पश्चिम द्रुतगती महामार्गांवरील दुकाने आणि आस्थापनांची पुन्हा तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले.

३६ हजारांहून अधिक आस्थापनांची तपासणी

१४ मे ते ४ जूनदरम्यान पाहणी झालेल्या ३६,७७३ पैकी १,१२४ आस्थापनांचे अहवाल देण्यात आले असून ६३८ प्रकरणांत खटले दाखल झाले आहेत. यातील प्रकरण सामोपचाराने मिटविणाऱ्या १९० आस्थापनांकडून १२ लाख २३ हजाराचा दंड वसूल झाला.

कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दोन टक्के वाढ

५८ वरून ६० टक्क्यांवर; जानेवारीपासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई: राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दोन टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. महागाई भत्ता आता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्यात आला असून, तो १ जानेवारी २०२६पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आला आहे.

जानेवारी ते जुलै २०२६ या कालावधीतील महागाई भत्ता वाढीची थकबाकीही राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. राज्याच्या वित्त विभागाकडून यासंबंधीचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न सरकारच्या विचाराधीन होता. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रमाणे यापुढे लागू राहणार आहे.

थकबाकी रोखीने

१ जानेवारी २०२६पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्यात यावा. सदर महागाई भत्तावाढ सात महिन्यांच्या (जानेवारी २०२६ ते जुलै २०२६ या कालावधीतील) थकबाकीसह ऑगस्ट महिन्याच्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी, असा आदेश सरकारने दिला आहे.

यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था आणि जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उपलेखाशीर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्याच उपलेखाशीर्षाखाली हा खर्च करण्यात येणार आहे.

विधानसभाध्यक्षांच्या निर्णय विलंबाने शिंदे गटाला फायदा

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात कपिल सिबल यांचा युक्तिवाद

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : विधानसभाध्यक्षांनी आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय प्रलंबित ठेवल्यामुळे शिंदे गटाला आपणच मूळ राजकीय पक्ष असल्याचा दावा करण्याची संधी मिळाली आणि त्याच आधारावर निवडणूक आयोगानेही त्यांना पक्ष बहाल केला, असा गंभीर मुद्दा शिवसेनेच्या ठाकरे गटाचे वकील कपिल सिबल यांनी मंगळवारी उपस्थित केला.

विधानसभाध्यक्षांना विधिमंडळ पक्ष हा राजकीय पक्ष ठरवण्याचा अधिकारच नाही, असा मुद्दा उपस्थित करून सिबल यांनी तासाभराच्या मुद्देसूद मांडणीत विधानसभा अध्यक्षांनी अधिकारकक्षेच्या बाहेर जाऊन निर्णय घेतल्याची टीका केली.

सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर ज्येष्ठ वकील कपिल सिबल यांनी शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेच्या प्रकरणावर युक्तिवाद केला. केंद्रीय निवडणूक आयोगाला मूळ राजकीय पक्ष कोणता, हे ठरवण्याचा अधिकार असला तरी, तसा निर्णय आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय झाल्यानंतरच व्हायला हवा. एखाद्या पक्षातील आमदारांविरोधात अपात्रतेची नोटीस बजावण्यात आली असताना, त्याच वेळी त्यातील एक गट निवडणूक आयोगाकडे जाऊन आपणच मूळ पक्ष असल्याचा दावा करतो, या प्रक्रियेवर सिबल यांनी आक्षेप घेतला.

विधिमंडळातील बहुमत म्हणजे राजकीय पक्ष नव्हे

● विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिंदे गटातील आमदारांची कृत्ये (फूट पडणे) स्वेच्छेने पक्षसदस्यत्व सोडल्याच्या दहाव्या अनुसूचीतील तरतुदीत येत नसल्याचा दावा केला होता. तसेच, विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीत आणि विश्वासदर्शक ठरावावेळी पक्षादेशाचे उल्लंघन केल्यामुळे आमदार अपात्र ठरत नाहीत, असेही त्यांचे म्हणणे होते. हे निष्कर्ष बेकायदा असल्याचा दावा सिबल यांनी केला.

● दहाव्या अनुसूचीच्या चौकटीबाहेर जात अध्यक्षांनी बहुमताच्या आधारे पक्षासंदर्भात निर्णय घेतला. मात्र, पक्ष आणि राजकीय पक्ष हे एकच नाहीत. सुभाष देसाई प्रकरणातही हे दोन्ही वेगवेगळे आहेत, ही बाब स्पष्ट झाली आहे, असे सिबल यांनी नमूद केले.

तर अपात्रतेचा मुद्दा गैरलागू

पक्षाचा प्रश्न आयोगासमोर जाऊ शकतो, हे गृहीत धरले तरी मूळ पक्ष कोणता, हे निश्चित करण्याची प्रक्रिया अपात्रतेच्या याचिकेवरील निर्णयानंतरच व्हावी, अशी स्पष्टता न्यायालयाने करावी, अशी मागणी सिबल यांनी केली. अन्यथा प्रत्येक वेळी हाच प्रश्न निर्माण होईल. अपात्रतेची याचिका दाखल केली जाईल, संबंधित आमदार आयोगाकडे जातील, आयोगाचा निर्णय येईल, मात्र अपात्रतेचा निर्णय अनेक वर्षे प्रलंबित राहील. दरम्यान, नवीन निवडणूकही होऊ शकते. मग अपात्रतेचा मुद्दाच गैरलागू होऊन जाईल, असे सिबल यांनी स्पष्ट केले.

आधी अपात्रतेवर निर्णय घेण्याची मागणी

१ आमदारांविरोधात अपात्रतेची कारवाई सुरू असताना त्या गटानेच आपण मूळ राजकीय पक्ष असल्याचा दावा निवडणूक आयोगाकडे केला, तर आयोगाने मूळ राजकीय पक्ष कोणता, हे ठरवण्यापूर्वी संबंधित आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय होण्याची वाट पाहायला हवी होती, असा युक्तिवाद सिबल यांनी केला.

२ तसे निवडणूक आयोगाने न केल्यामुळे भविष्यात अशा आमदार-खासदारांच्या फुटीच्या प्रकरणांमध्ये गंभीर घटनात्मक पेच निर्माण होईल, असेही सिबल यांनी निदर्शनास आणून दिले. आधी अपात्रतेचा प्रश्न निकाली काढावा आणि त्यानंतरच कोणता गट मूळ पक्ष आहे, हा प्रश्न ठरवावा, अशी भूमिका सिबल यांनी मांडली.

आधी १६, मग २२...

शिवसेना फुटीनंतर उद्धव ठाकरे गटाने २३ जून २०२२ रोजी १६ आमदारांविरोधात, २७ जून रोजी आणखी २२ आमदारांविरोधात याचिका दाखल केली. ५ जुलै रोजी एकूण ३९ आमदारांविरोधात याचिका दाखल केली होती. या याचिका विधानसभाध्यक्षांनी १० जानेवारी २०२४ रोजी दिलेल्या चार निर्णयांद्वारे फेटाळल्या. सुभाष देसाई प्रकरणात राजकीय पक्षच नेता व प्रतोद नियुक्त करू शकतो, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. या निकालाच्या विरोधात जाऊन विधानसभाध्यक्षांनी शिंदे गटातील आमदारांना अपात्र न ठरवण्याचा निर्णय घेतल्याचा मुद्दा सिबल यांनी मांडला.

१९९९च्या घटनेचा संबंध काय?

विधानसभाध्यक्षांनी २०१८मधील शिवसेनेची नेतृत्व रचना आणि पक्षघटना विश्वासार्ह नसल्याचे मानून विधिमंडळातील बहुमताचा आधार घेतला. मात्र, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे होते. त्यांची नियुक्ती झालेली होती, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने निवडणूक लढवली होती आणि त्याच नेतृत्वाखाली पक्षाला निवडणूक चिन्ह मिळाले होते. विधानसभाध्यक्षांनी शिवसेनेच्या १९९९च्या घटनेची दखल घेण्याचे कारणच नव्हते. २०१८ची घटना योग्य नाही, असे म्हणत १९९९च्या घटनेचा संदर्भ घेणे विधानसभाध्यक्षांच्या अधिकारकक्षेच्या बाहेर आहे, याकडे सिबल यांनी लक्ष वेधले.

जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ला मंजुरी; पाच जिल्ह्यांना लाभ

मुंबई : जायकवाडी प्रकल्प टप्पा-२च्या कामासाठी ६ हजार ४७७ कोटी ८८ लाख रुपयांची तरतूद करण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे गोदावरी खोऱ्यातील सिंदफणा नदीवरील माजलगाव धरणाच्या कामाला गती मिळणार आहे. या प्रकल्पामुळे छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, बीड, परभणी आणि नांदेड या पाच जिल्ह्यांतील सुमारे १ लाख ३१ हजार ६५२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळेल.

जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ला ही पाचवी सुधारित प्रशासकीय मान्यता आहे. यामुळे ४५४ दशलक्ष घनमीटर (द.ल.घ.मी.) साठवण क्षमता असलेले माजलगाव धरण अस्तित्वात येणार आहे. यामध्ये माजलगाव (लोणी सावंगी) उपसा योजना, साळींबा ठिबक उपसा योजना, शिरस मार्ग निम्नपातळी बंधारा, रोशनपुरी उच्चपातळी बंधारा आणि १४८ किलोमीटर लांबीचा माजलगाव उजवा कालवा यांचा समावेश आहे. या कालव्यावरील गल्हाटी, धोंड, उकडगाव, मुरंबी, पेंडू आणि सुषमनगर हे सहा मार्गस्थ जलाशय तसेच माजलगाव-मासोळी प्रकल्पाची उंची वाढविण्याचे कामही करण्यात येणार आहे.

जायकवाडी प्रकल्पाच्या कामाचे दोन टप्प्यांत नियोजन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्र्यांनाच सर्वाधिकार

मंत्र्यांच्या निर्णयात फेरफार करण्याचे अधिकार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : प्रशासनात मुख्यमंत्र्यांना सर्वाधिकार असतील, अशी राज्य शासनाच्या कामकाजाच्या नियमावलीत स्पष्टपणे तरतूद करण्यात आली आहे. मंत्र्यांच्या निर्णयांवर हस्तक्षेप करण्याचा तसेच ते निर्णय बदलण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना मिळाला आहे.

राज्य सरकारने लागू केलेल्या नव्या कामकाज नियमावलीत सरकारमध्ये मुख्यमंत्री, तर प्रशासनात मुख्य सचिव हेच सर्वोच्च असतील, यावर कायदेशीर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. मात्र, अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये मुख्यमंत्र्यांना हस्तक्षेप करता येणार नाही. मुख्यमंत्र्यांना प्रशासनात सर्वाधिकार असतात. पण मध्यंतरी न्यायालयाच्या एका निर्णयामुळे हा पेच निर्माण झाला होता.

राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने सुधारित महाराष्ट्र शासन कामकाज नियम, २०२६ लागू केले असून, त्याची अंमलबजावणीही सुरू करण्यात आली आहे. या नव्या नियमांनुसार, सार्वजनिक हितासाठी मुख्यमंत्री कोणत्याही मंत्र्याचा निर्णय बदलू शकतात. तसेच एखाद्या मंत्र्याचा निर्णय बदलता किंवा रद्द करताना मुख्यमंत्र्यांना त्यामागची कारणे लेखी द्यावी लागतील.

नव्या नियमांनुसार, एखाद्या विभागाचा कारभार सांभाळणारा मंत्री त्या विभागातील निर्णयांसाठी मुख्यत्वे जबाबदार असेल. मात्र, एखाद्या प्रकरणात सार्वजनिक हिताचा मुद्दा असल्यास मुख्यमंत्री त्या मंत्र्याच्या निर्णयात हस्तक्षेप करू शकतात. आणि आवश्यकता वाटल्यास कारणे नमूद करून तो निर्णय बदलूही शकतात.

मुख्यमंत्री कोणत्याही सरकारी विभागातील एखाद्या प्रकरणाची फाइल किंवा कागदपत्रे मागवू शकतात. एखाद्या नियमाचा अर्थ लावताना किंवा त्याच्या व्याख्येबाबत शंका निर्माण झाल्यास हा मुद्दा मुख्यमंत्र्यांकडे पाठवला जाईल. अशा प्रकरणात मुख्यमंत्र्यांचा निर्णय अंतिम असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणत्याही विभागाला अर्थ विभागाची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय महसुलात सवलत देणारा किंवा सरकारवर अतिरिक्त खर्चाचा भार टाकणारा निर्णय घेता येणार नाही. तसेच जमीन, महसूल, खनिज किंवा वनहक्कांशी संबंधित सवलत किंवा परवाना देण्याच्या प्रक्रिया पाळावी लागेल.

एखाद्या निर्णयामुळे महाराष्ट्र सरकारचा केंद्र सरकार किंवा अन्य राज्यांशी वाद होण्याची शक्यता असल्यास, याची माहिती तातडीने मुख्यमंत्र्यांना देणे संबंधित विभागास बंधनकारक असेल. याशिवाय सरकारकडून मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखालील विशेष अधिकारप्राप्त समित्याही स्थापन करता येतील.

नवीन नियमावली का लागू ?

● राज्यातील महायुती सरकारच्या काळात २०२२मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या एका निर्णयाबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयामुळे राज्य सरकारला शासन कामकाज नियमात सुधारणा करावी लागली.

म्हणून एकनाथ शिंदे यांनी घेतलेला निर्णय रद्द करताना नागपूर खंडपीठाने मंत्र्यांचा निर्णय बदलण्याचा किंवा त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना नाही, असा निकाल दिला होता.

● निर्णय घेताना मुख्यमंत्र्यांनी ते कोणत्या तरतुदीखाली निर्णय घेत आहेत, हे स्पष्ट करायला हवे होते, असेही न्यायालयाने नमूद केले होते. या निर्णयाची दखल घेत सरकारने शासन कामकाज नियमात नव्याने सुधारणा करून तशी अधिसूचना काढली आहे.

● चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या पदभरती प्रकरणात मुख्यमंत्री

U GRO CAPITAL

यूग्रो कॅपिटल लिमिटेड

CIN: L67120MH1993PLC070739

नोंदणीकृत कार्यालय: बी-१७, चौथा मजला, आर्ट गिल्ड हाऊस, फिनिक्स मार्केट सिटी, कुर्ला (पश्चिम), मुंबई -४०००७०

ई-मेल : cs@ugrocapital.com, **वेबसाईट:** www.ugrocapital.com

फॉर्म क्र. CAA. २

[कंपन्या (तडजोडी, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि ७ सह कलम २३० (३) अन्वये]

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ

C.A. (CAA) क्र. १४१/एमबी/२०२६

कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात;

आणि

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ५२ सह वाचण्यात येणाऱ्या कलम २३० ते २३२ आणि त्यातील इतर लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांच्या प्रकरणात;

आणि

प्रफिक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड (''हस्तांतरकर्ता कंपनी'' किंवा ''प्रथम अर्जदार कंपनी'') CIN: U65999MH2017PTC295967 आणि यूग्रो कॅपिटल लिमिटेड (''हस्तांतरिती कंपनी'' किंवा ''द्वितीय अर्जदार कंपनी'') CIN: L67120MH1993PLC070739 तसेच त्यांचे संबंधित भागधारक आणि धनको यांच्यामधील एकत्रीकरण योजनेच्या (''योजना'') प्रकरणात

यूग्रो कॅपिटल लिमिटेड,
कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींतर्गत स्थापित कंपनी, नोंदणीकृत कार्यालय बी-१७, चौथा मजला, आर्ट गिल्ड हाऊस, फिनिक्स मार्केट सिटी, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०००७० CIN: L67120MH1993PLC070739))) ... द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनी

द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनी च्या समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) आणि असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह)च्या सभेची सूचना व जाहिरात

याद्वारे सूचित करण्यात येते की, ६ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशानुसार (**''आदेश''**), मा. राष्ट्रीय विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (**''एनसीएलटी''**) यांनी कंपनी अधिनियम, २०१३ (''अधिनियम'') मधील कलम ५२ सह वाचण्यात येणाऱ्या कलम २३० ते २३२ आणि त्यांअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांच्या अनुषंगाने प्रफिक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड (**''प्रथम अर्जदार कंपनी''** / **''हस्तांतरकर्ता कंपनी''**) आणि यूग्रो कॅपिटल लिमिटेड (**''द्वितीय अर्जदार कंपनी''** / **''हस्तांतरिती कंपनी''**) आणि त्यांच्या संबंधित समभागधारक व धनको यांच्यादरम्यान एकत्रीकरण योजना विचारात घेण्यासाठी आणि योग्य वाटत असल्यास ती दुरुस्त्यांसह किंवा त्यांशिवाय मंजूर करण्यासाठी द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) आणि असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांच्या स्वतंत्र बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (**''व्हीसी''**) / इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे (**''ओएव्हीएम''**) घेण्याचे निर्देश दिले आहेत.

सदर आदेश अनुषंगाने आणि त्यामध्ये दिलेल्या निर्देशांनुसार, असेही सूचित करण्यात येते की, द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) आणि असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांच्या स्वतंत्र सभा **व्हीसी/ओएव्हीएम**च्या माध्यमातून घेण्यात येतील. या सभा सदर अधिनियमातील मधील कलम १०८ सह वाचण्यात येणाऱ्या कलम २३०(४) च्या तरतुदी, कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० व इतर लागू तरतुदी, वेळोवेळी सुधारित, सिक्युरिटिज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स), रेग्युलेशन्स, २०१५ ("SEBI LODR Regulations") मधील नियम ४४(१) आणि या संदर्भात भारतीय कंपनी सचिव संस्थेने जारी केलेल्या, वेळोवेळी सुधारित, सामान्य सभांबाबत सचिवीय मानक - २ (''एसएस-२'')चे पालन करीत खालील तक्त्यात नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार घेण्यात येतील.

अ. क्र.	सभेचा वर्ग	वेळ (भाप्रवे)	सभेचा दिवस / दिनांक
१	समभाग धारक	स. १०.३० वा.	मंगळवार, दि. २२ सप्टेंबर, २०२६
२	सुरक्षित धनको	दु. १२.१५ वा.	मंगळवार, दि. २२ सप्टेंबर, २०२६
३	असुरक्षित धनको	दु. २.३० वा.	मंगळवार, दि. २२ सप्टेंबर, २०२६

द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) आणि असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांची संबंधित सभेस उपस्थित राहण्याची आणि मतदान करण्याची पात्रता निश्चित करण्यासाठी कट-ऑफ दिनांक तसेच वरील सभांसाठी दूरस्थ ई-मतदानाचा कालावधी खालीलप्रमाणे आहे:

सभेचा वर्ग	समभागधारक	सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह)	असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह)
कट-ऑफ दिनांक	१५ सप्टेंबर, २०२६	३१ मार्च, २०२६	३१ मार्च २०२६
दूरस्थ ई-मतदान दिनांक व वेळ			
प्रारंभ वेळः	शनिवार, दि. १९ सप्टेंबर, २०२६ रोजी स. ९.०० वा.	शनिवार, १९ सप्टेंबर, २०२६ स. ०९.०० वाजता	शनिवार, १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ०९:०० वा. भाप्रवे
समाप्ती वेळः	सोमवार, दि. २१ सप्टेंबर, २०२६ रोजी सायं. ५.०० वा.	सोमवार, २१ सप्टेंबर, २०२६ सायं. ०५.०० वाजता	सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वा. भाप्रवे

द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीने सभांमध्ये दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची, व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सभांमध्ये सहभागी होण्याची आणि सभा सुरु असताना ई-मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'') यांची नियुक्ती केली आहे. त्यानंतर एनएसडीएलकडून दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल मतदानासाठी निष्क्रिय केले जाईल आणि ज्या व्यक्तींनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले नाही त्यांच्यासाठी संबंधित बैठकीदरम्यान ते सक्षम केले जाईल.

द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीने कंपन्या (तडजोडी, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमाच्या कलम १०२, २३० ते २३२ अंतर्गत आवश्यक असल्यानुसार ३० जून, २०२६ रोजी द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीकडे नोंदवहीमध्ये / लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये आणि लागू असेल त्याप्रमाणे, द्वितीय अर्जदार कंपनी/ हस्तांतरिती कंपनीकडे, डिपॉझिटरी, रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट किंवा इतर संबंधित अभिलेखांमध्ये ज्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेस नोंदवलेले आहेत / उपलब्ध आहेत अशा सर्व समभाग धारकांना आणि ३१ मार्च, २०२६ रोजी द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीकडे असलेल्या पुस्तके / अभिलेखांमध्ये ज्यांची नावे आहेत आणि द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनी यांचेकडे किंवा, लागू असेल त्याप्रमाणे, इतर संबंधित अभिलेखांमध्ये ज्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेस उपलब्ध / नोंदविलेले आहेत अशा सुरक्षित घेणेकरी (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) आणि असुरक्षित घेणेकरी (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांना योजना आणि खुलासापर वर्णनासह सभा भरविण्यात येणार असल्याची सूचना (''सूचना'') इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्याचे काम १८ ऑगस्ट, २०२६ रोजी पूर्ण केले आहे. ज्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेस उपलब्ध नाहीत अशा समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) आणि असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांना एनसीएलटीच्या आदेशानुसार कागदपत्रे पाहण्यासाठी वेबलिंक आणि क्यूआर कोड असलेली पत्रे देण्यात आली आहेत.

वरील कागदपत्रे (अ) द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या www.ugrocapital.com, (ब) स्टॉक एक्स्चेंज च्या म्हणजे बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com येथे; आणि (क) एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

परिशिष्टे यांसह खुलासापर विवरणासह सूचनेची प्रत, संबंधित सभांच्या दिनांकापर्यंत सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत, भाप्रवे, द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून विनामूल्य मिळविता येईल किंवा भागधारणा किंवा घेणेकरी यांच्या माहिती देऊन cs@ugrocapital.com या ई-मेलवर विनंती पाठवून प्राप्त करता येईल.

एनसीएलटीने द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) आणि असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांच्या सभांसाठी एनसीएलटीचे सेवानिवृत्त सदस्य (तांत्रिक), श्री. एच. व्ही. सुब्बा राव यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे.

तसेच, एनसीएलटीने श्रीमती आकांक्षा मोटा (सदस्यत्व क्र. ACS 24626 आणि CP क्र. 15096) यांची द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) आणि असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांच्या सभांसाठी आणि द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) आणि असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) प्रत्येक सभेदरम्यान दूरस्थ ई-मतदान आणि ई-मतदानाचे निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने परिनिरीक्षण करण्यासाठी परिनिरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांना, लागू असेल त्याप्रमाणे, वर नमूद केलेल्या पद्धतीने आणि दिवशी, दिनांकास व वेळेस संबंधित सभांना उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सभांमध्ये सहभागी होणाऱ्या समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांची उपस्थिती सदर अधिनियमाच्या कलम १०३ अंतर्गत गणपूर्तीसाठी ग्राह्य धरण्यात येईल. सभेच्या प्रारंभी आवश्यक गणपूर्ती नसल्यास, सभा ३० मिनिटांसाठी तहकूब केल्या जातील आणि त्यानंतर उपस्थित असलेले समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) हे गणपूर्ती करीत आहेत असे समजण्यात येईल.

द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीचे समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) संबंधित सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदान सुविधेद्वारे किंवा सभेदरम्यान उपलब्ध करून दिलेल्या ई-मतदान सुविधेद्वारे उपस्थित राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र आहेत. सभा व्हीसी/ओएव्हीएमद्वारे घेण्यात येणार असल्याने प्रतिनिधीमार्फत मतदानास परवानगी दिली जाणार नाही आणि समभागधारक, सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांच्यासाठी प्रतिनिधी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध असणार नाही. तथापि, कंपनीच्या बाबतीत अधिकृत प्रतिनिधीच्या माध्यमातून मतदानास परवानगी असेल, परंतु त्यासाठी कंपन्या (तडजोडी, व्यवस्था आणि एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम १० अंतर्गत आवश्यक असल्यानुसार विहित प्रपत्र / अधिकारपत्र कंपनीकडे cs@ugrocapital.com येथे आणि एक प्रत shinil.nambrath@ugrocapital.com येथे संबंधित सभा सुरू होण्याच्या किमान ४८ (अठ्ठेचाळीस) तास आधी सादर करणे आवश्यक आहे.

ज्या समभागधारकांचे नाव संबंधित सभेसाठी समभागधारक यांच्यासाठीच्या कट-ऑफ दिनांकास, म्हणजेच १५ सप्टेंबर, २०२६ रोजी डिपॉझिटरी यांचेकडे असलेल्या सभासद नोंदवहीमध्ये / लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये नोंदविलेले आहे त्यांनाच ई-मतदान सुविधेचा (दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून किंवा सभा सुरु असताना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या ई-मतदान सुविधेच्या माध्यमातून) लाभ घेता येईल आणि समभागधारकांच्या वर नमूद सभेस उपस्थित होता येईल. समभागधारकांचे मतदान हक्क समभागधारकांसाठी असलेल्या कट-ऑफ दिनांकास द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या भरणा केलेल्या भागभांडवलामधील त्यांच्या समभागांच्या गुणोत्तराच्या प्रमाणात समभागधारकांचे मतदान हक्क असतील. समभागधारकांसाठी असलेल्या कट-ऑफ दिनांकास द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीचे समभागधारक नसलेल्या व्यक्तींनी ही सूचना केवळ माहितीसाठी आहे असे समजावे.

संबंधित सभांसाठी असलेल्या सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) असलेल्या कट-ऑफ दिनांकास म्हणजे ३१ मार्च, २०२६ रोजी प्रथम अर्जदार कंपनी / हस्तांतरकर्ता कंपनीच्या ज्या सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) चे नाव द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीच्या अभिलेखांमध्ये नोंदविलेले आहे त्यांनाच ई-मतदानाच्या सुविधेचा (दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून किंवा सभा सुरु असताना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या ई-मतदान सुविधेच्या माध्यमातून) लाभ घेता येईल आणि सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांच्या वर नमूद सभेस उपस्थित होता येईल. सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांचे मतदान हक्क सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांचेसाठी असलेल्या कट-ऑफ दिनांकास द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीकडे असलेल्या पुस्तके / अभिलेखांच्या अनुसार त्यांना घेणे असलेल्या थकबाकी रकमेच्या प्रमाणात सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांचे मतदान हक्क असतील. सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) यांचेसाठी असलेल्या कट-ऑफ दिनांकास द्वितीय अर्जदार कंपनी / हस्तांतरिती कंपनीचे सुरक्षित धनको (सुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) / असुरक्षित धनको (असुरक्षित नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर धारकांसह) नसलेल्या व्यक्तींनी ही सूचना केवळ माहितीसाठी आहे असे समजावे.

